**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा उद्या शेवटचा दिवस, मराठवाड्यात सर्वाधिक तर कोकणात सर्वात कमी उमेदवार रिंगणात

- ९९ टक्के बंडखोर उमेदवारी अर्ज मागे घेतील असा भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना विश्वास

- नंदूरबार जिल्ह्यात काल रात्री झालेल्या अपघातात ५ जणांचा मृत्यू

**आणि**

- न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या आणि शेवटच्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतीय संघ पराभूत, तब्बल १२ वर्षानंतर मायदेशात कसोटी मालिका गमावली

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. २८८ मतदारसंघांमध्ये एकंदर ७ हजार ६६ उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत. मराठवाड्यातल्या मतदारसंघांमध्ये सर्वाधिक उमेदवार आहेत तर कोकणात उमेदवारांची संख्या अतिशय मर्यादित आहे.

नांदेड जिल्ह्यातल्या भोकर विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक म्हणजे १४० उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. त्याखालोखाल बीड जिल्ह्यात माजलगाव मतदारसंघात ९८, तर बीडमध्ये ९० उमेदवारांचे अर्ज वैध आहेत. राज्यात महाड विधानसभा मतदारसंघात सर्वात कमी म्हणजे फक्त ५ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. मुंबईत चेंबूर, माहीम आणि सिंधुदुर्गातल्या सावंतवाडीत प्रत्येकी ६, तर शिवडी आणि कुडाळमध्ये ७ उमेदवारांचे अर्ज ग्राह्य धरण्यात आले आहेत.

**<><><><>**

भाजपाचे ९९ टक्के बंडखोर उमेदवारी अर्ज मागे घेतील, असा विश्वास प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. जे बंडखोर उमेदवारी अर्ज मागे घेणार नाहीत, त्यांना ६ वर्षांसाठी पक्षातून निलंबित करू असा इशारा त्यांनी दिला.

**<><><><>**

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील आज कोणत्या उमेदवारांना पाठिंबा द्यायचा याचा निर्णय घेत आहेत. मराठा समाजाचं हित बघणाऱ्या उमेदवारांना पाठिंबा देण्याची त्यांची भूमिका आहे. जिंकू शकतील अशाच जागांवरच्या उमेदवारांना पाठिंबा देऊ, अन्य ठिकाणी नाही, असं आज ते वार्ताहरांशी बोलताना म्हणाले. गेल्या काही दिवसात विविध पक्षाच्या राजकीय पक्षाच्या नेत्यांनी त्यांची भेट घेतली आहे.

**<><><><>**

राज्यातल्या कापूस शेतकऱ्यांचं हित लक्षात घेऊन केंद्र सरकारनं कापसाच्या आयातीवर तत्काळ बंदी घालून हमीभावानं कापूस खरेदी करण्याचे निर्देश भारतीय कापूस महामंडळाला द्यावेत द्यावेत, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पत्राद्वारे केली आहे. कापूस उत्पादनात महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर असून ४० लाखांपेक्षा जास्त शेतकरी कापूस पिकवतात. तरीही २२ लाख गाठी कापसाची आयात झाल्याच्या बातम्यांमुळे देशात कापसाच्या दरात मोठी घसरण होण्याची शक्यता आहे. भारतीय कापूस महामंडळाकडेही विकल्या न गेलेल्या ११ लाख कापूस गाठी पडून आहेत, असं पटोले यांनी पत्रात म्हटलं आहे.

**<><><><><>**

धनगर समाजाच्या यशवंत सेनेनं येत्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला पाठींबा जाहीर केला आहे. या संघटनेचे अध्यक्ष माधव गडदे यांनी काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्यानंतर ही भूमिका जाहीर केली आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज बुलडाणा जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

गडचिरोली जि्ल्ह्यातल्या आरमोरी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार हरिराम वरखडे यांचं काल रात्री नागपुरात एका खासगी रुग्णालयात दीर्घ आजारानं निधन झालं. ते ८३ वर्षांचे होते. आज दुपारी आरमोरी तालुक्यातल्या जोगीसाखरा या त्यांच्या मूळ गावी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

हरिराम वरखडे हे १९९० च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेच्या तिकिटावर आरमोरी विधानसभा मतदारसंघातून निवडून आले होते. पुढे १९९२ मध्ये त्यांनी छगन भुजबळ यांच्या समवेत काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता. त्यानंतर ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. महात्मा फुले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केलं होतं.

**<><><><>**

झारखंडमध्ये सत्तेत आल्यावर समान नागरी कायदा लागू करू, मात्र आदिवासींना त्याच्या कक्षेतून बाहेर ठेवू असं आश्वासन भाजपानं दिलं आहे. झारखंड विधानसभा निवडणुकीसाठीचं पक्षाचं संकल्प पत्र केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज रांचीमध्ये प्रसिद्ध केलं. त्यावेळी त्यांनी हे आश्वासन दिलं. संथाल परगणा भागातली बांग्लादेशी घुसखोरी रोखण्यासाठी कायदे बनवले जातील असं सांगून या लोकांनी आदिवासी महिलांशी विवाह करुन त्यांची जमीन हडपल्याचा दावा त्यांनी केला.

कायदा झाल्यावर आदिवासींना त्यांच्या जमिनी पुन्हा दिल्या जातील. गोगो दीदी योजनेअंतर्गत सर्व महिलांना एकवीसशे रुपये देऊ असं आश्वासन त्यांनी दिलं. सर्व कुटुबांना ५०० रुपयात गॅस सिलिंडर, दसरा आणि रक्षाबंधनला १-१ गॅस सिलिंडर मोफत देण्याचं आश्वासन सुद्धा त्यांनी दिलं. पदवीधर आणि पदव्युत्तर बेरोजगारांना २ वर्षांसाठी २ हजार रुपये मानधन देऊ. ५ वर्षात रोजगाराच्या ५ लाख संधी निर्माण करु. सरकारमधल्या ८७ हजार रिक्त जागा भरू असंही ते म्हणाले.

**<><><><>**

केरळमधल्या वायनाड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेस उमेदवार प्रियांका गांधी आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज जाहीर सभा घेतली. प्रियांका गांधी कोरोम आणि थरिओडे इथंही प्रचारसभा घेणार आहेत. तर राहुल गांधी अरीकोड इथं प्रचारसभा घेणार आहेत.

एलडीएफचे उमेदवार सत्यन मोकेरी यांनी तिरुवंबडी भागात प्रचार केला, तर राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवार नव्या हरिदास यांनी कलपेट्टा इथं घरोघरी जाऊन प्रचार केला.

**<><><><><>**

आज भाऊबीज, दिवाळीचा शेवटचा दिवस. भावाबहिणीच्या गोड नात्याला समर्पित असलेला हा सण देशाच्या वेगवेगळ्या भागात, भाई फोटा, भाई टीका, यमद्वितीया अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखला जातो. या दिवशी बहीण आपल्या भावाच्या टिळा लावून त्याला ओवाळते, त्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते आणि भाऊ बहिणीला ओवाळणी घालतो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना भाऊबीजेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. या सणामुळे भावाबहिणींमधलं प्रेम अधिक घट्ट होईल, असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. गृहमंत्री अमित शहा यांनीही समाजमाध्यमावरून शुभेच्छा दिल्या आहेत. प्रेम, समर्पणभाव आणि भक्तिभावाचा हा सण सर्वांच्या आयुष्यात भरभरून आनंद घेऊन येईल, असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

पुण्यात दिवाळी पाडव्याच्या दिवशी घरगुती गॅस सिलिंडर स्फोटाच्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन जण गंभीर जखमी झाल्याचं वृत्त आहे. वारजे माळवाडी आणि अप्पर इंदिरानगर परिसरात दोन घरगुती सिलेंडरचे स्फोट झाल्याच्या घटना घडल्या आहेत. यात दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.

**<><><><><>**

नंदुरबार जिल्ह्यात भरधाव जीपनं दिलेल्या धडकेत पाच जणांचा मृत्यू झाला. काल रात्री उशीरा नंदुरबार ते धानोरा रस्त्यावर लोय पिंपळोद गावाजवळ हा

अपघात झाला. रस्त्याच्या कडेला नादुरुस्त दुचाकीजवळ उभ्या असलेल्यांना भरधाव गाडीनं धडक दिली. यात १२ ते ४० वर्षं वयोगटातल्या पाच जणांचा मृत्यू झाला. या अपघातात एक जण गंभीर जखमी असून त्याला नंदुरबार इथं जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं असल्याची माहिती, आमच्या वार्ताहरानं दिली आहे.

**<><><><><>**

सप्टेंबर महिन्यात व्हाट्सॲपनं भारतात त्यांच्या धोरणाचा भंग करणाऱ्या ८५ लाखांहून अधिक खात्यांवर बंदी आणली आहे. २०२१ च्या नव्या माहिती तंत्रज्ञान नियमांनुसार ही कारवाई केल्याचं व्हाट्सॲपच्या सप्टेंबर महिन्याच्या अहवालात म्हटलं आहे. व्हाट्सॲपचे भारतात ६० कोटींहून अधिक वापरकर्ते आहेत.

**<><><><><>**

भारतीय क्रिकेट संघानं तब्बल १२ वर्षांनंतर घरच्या मैदानावर कसोटी मालिका गमावली आहे. सन २०००नंतर पहिल्यांदा भारतीय संघाला देशात झालेल्या कसोटी मालिकेतला एकही सामना जिंकला आलेला नाही.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या मुंबईत वानखेडे मैदानावर झालेल्या तिसऱ्या आणि अखेरच्या कसोटी सामन्यात न्यूझीलंडनं भारताचा २५ धावांनी पराभव केला, आणि मालिका ३-० अशी जिंकली.

आज सामन्याच्या तिसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात न्यूझीलंडचा दुसरा डाव केवळ १४ चेंडूत ३ धावांची भर घालून १७४ धावांवर आटोपला. न्यूझीलंडच्या

उर्वरीत एका खेळाडूला रविंद्र जडेजानं बाद केलं, आणि दोन्ही डावांत प्रत्येकी ५ गडी बाद करत, सामन्यात एकूण १० बळी टिपले.

पहिल्या डावातल्या २८ धावांच्या आघाडीमुळे भारतासमोर विजयासाठी १४७ धावांचं आव्हान होतं. मात्र न्यूझीलंडच्या फिरकी गोलंदाजांसमोर भारताची फलंदाजी गडगडली, आणि भारताचा दुसरा डाव केवळ १२१ धावांत आटोपला. अर्धशतकवीर ऋषभ पंतशिवाय आघाडीच्या कोणत्याही फलंदाजाला खेळपट्टीवर तग धरता आला नाही. ऋषभनं सर्वाधिक ६४ धावा केल्या. न्यूझीलंडच्या एजाज पटेल यानं दुसऱ्या डावात भारताचे ६ गडी बाद करत सामन्यात एकूण ११ बळी टिपले. त्याला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. विल यंग मालिकावीर ठरला.

**//<><><><><>//**